जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५३३ दिनांक - १८/१२/२०२४**

बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणें शहर

## तासगांव तालुक्यातील वायफळे खुन प्रकरणातील तीन आरोपी ताब्यात

तासगांव पोलीस ठाणेगुरननं ५५९/२०२४ बीएनएस कलम १०३(१),१०९ (१),१८९ (२),१९१(२) , १९१(३),१९०,आर्म अँक्ट ४,२५,२७ प्रमाणे दाखला असून,दाखल गुन्ह्यात तासगांव तालुक्यातील वायफळे येथील रोहित फाळके याच्यावर विशाल फाळके याने व त्याचे साथीदारांसह कोयता आणि तलवारीने हल्ला केला.होता त्यात ओंकार ऊर्फ रोहित फाळके हा जागीच ठार झाला होता तर आई वडील इतर असे पाचजण जखमी झाले होते. तालुक्यातील वायफळे येथील ओंकार ऊर्फ रोहित संजय फाळके याच्या खून प्रकरणी तासगाव पोलिस व सांगलीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या टिम या आरोपीच्या शोधात पुणे येथे थांबुन होत्या. तरी बिबवेवाडी पोलीस ठाणेचे **पोलीस अंमलदार सुमित ताकपेरे,प्रणय पाटील** यांना गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,सदर गुन्हयातील तीन आरोपी हे गॅस गोडाऊन बिबेवाडी येथे थांबून असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यानी तात्काळ तपास पथकाचे प्रमुख पो.उप-निरी अशोक येवले याना कळवले असता,त्यानी सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शंकर साळुंखे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) मनोजकुमार लोंढे यांना कळवले त्यांनी तात्काळ ताब्यात घेण्याबाबत आदेशित केल्याने, आरोपीच्या शोधात आलेले तासगाव पोलीस ठाण्याचे सहा.पोनिरी.पवार व पथक याना घेवुन मिळालेल्या बातमीप्रमाणे खात्री केली असता, गॅसगोडाऊन २७६ ओटा बिबेवाडी येथे तीन इसम अंधारात थांबल्या बाबत दिसून आल्याने वर नमूद तपास पथकाच्या मदतीने त्यांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे. **१) अनिकेत संतोष खुळे वय १९ रा. खोपडेनगर कात्रज तलावाजवळ कात्रज पुणे. २) आकाश महिपत मळेकर वय २० वर्षे रा. पापल वस्ती बिबेवाडी पुणे** एक विधीसंघर्षित बालक असे असल्याचे सांगितले त्यांना वर नमूद गुन्हाबाबत विचारणा केली असता, त्यांतिघांनी कबुली दिल्याने त्यांना तासगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त श्री राजकमार शिंदे, परिमंडळ ५ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री धन्यकुमार गोडसे, वानवडी विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शंकर साळुंखे,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री मनोज कुमार लोंढे, तपास पथकातील अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री अशोक येवले, पोलीस हवालदार संजय गायकवाड, ,संतोष जाधव,पोलीस अमंलदार सुमित ताकपेरे, प्रणय पाटील ज्योतिष काळे,शिवाजी येवले,आशिष गायकवाड, ,प्रणय पाटील, अजय कामठे, यांनी केली आहे.